# माहितीचा अधिकार

शासनयंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता यावी, भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे. प्रशासकीय कार्यपद्धती, नियम व इतर शासकीय कामांमध्ये गैरव्यवहारास वाव राहू नये, शासकीय कार्यपद्धतीबद्दल सामान्य जनतेला साशंकता वाटू नये व त्यांची कामे विनाविलंब, सहजगत्या व्हावीत यासाठी 'माहितीचा अधिकार' या कायदयाची निर्मिती झाली.

माहितीच्या अधिकाराचा कायदा व्हावा यासाठी राज्यातील आणि देशातील अनेक व्यक्तींनी आणि वेगवेगळ्या संस्थांनी अथक परिश्रम घेतले. 'माहितीचा अधिकार' लागू करण्यासाठी महाराष्ट्रात भ्रष्टाचार विरोधी जन-आंदोलनाच्या माध्यमातून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्यभर सभा, जनजागृती अभियान दौरा, उपोषण याद्वारे चळवळ उभी केली. माहिती अधिकारासंबंधाने सरकारने 2000 मध्ये कायदा केला. मात्र या कायदयामध्ये माहिती देण्यापेक्षा माहिती न देण्यावरच अधिक भर आहे, अशी तक्रार सामाजिक संघटनांनी केली. तेव्हा सरकारने या कायदयाचा मसुदा बदलून दुसरा सुधारित कायदा करण्याचा निर्णय जाहिर केला. त्यानुसा तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 10 सप्टेंबर 2001 रोजी मुंबई येथे बैठक झाली. त्यामध्ये उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, विधी व न्याय राज्यमंत्री, सा. प्रशासन राज्यमंत्री, मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, विधी व न्याय

विभाग अण्णा हजारे, माधवराव गोडबोले, प्राचार्य सत्यरंजन साठे, विजय कुवळेकर यांच्या समवेत बैठक होऊन राजस्थान, तामिळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा या राज्यांनी केलेल्या माहिती अधिकार कायदयाचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्याचा आदर्श कायदा करण्याचा निर्णय झाला. राष्ट्रपतींनी या कायदयावर सही केल्यावर 11 ऑगस्ट 2003 पासून महाराष्ट्र राज्यासाठी हा कायदा लागू झाला. पुर्वलक्षी प्रभावाने 2002 पासूनच कायदा लागू झाल्याचे जाहिर करण्यात आले. यानंतर केंद्रसरकारने ऑक्टोबर 2005 मध्ये हा कायदा करून सर्व देशभर हा कायदा लागू केला.

डॉ.बी.टी.लहाने
प्राचार्य, संभाजीराव केंद्रे
महाविद्यालय, जळकोट

## RTI या कायद्यामुळे नागरिकांना प्राप्त अधिकार

1) या कायद्यामुळे प्रत्येक नागरिक वेगवेगळ्या खात्यांच्या प्रशासकीय विभागाची (फाईलची) माहिती घेऊ व पाहू शकतो.

2) आपल्या गाव-परिसरात रस्त्यांची कामे, इतर शासकीय बांधकामे, यासारखी विकासाची कोणतेही कामे चालललेली असतील त्या कामांची आवश्यकतेनुसार नागरिक माहिती घेऊ शकतात.

3) आपल्या गावात, तालुका-जिल्हा स्तरावर होणारा शासकीय, अन्य-धान्य पुरवठा, गॅस पुरवठा या सारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याबद्दल माहिती घेऊ शकतात.

4) फक्त शासकीय कार्यालयेच नाही, तर निमसरकारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानाचा लाभ घेणाऱ्या संस्था-कंपन्या शिक्षणसंस्था, धर्मादायकडे नोंदणी झालेल्या संस्था, व ट्रस्ट, बँका अशा सर्व कार्यालयांची त्यांना माहिती घेता येते.

5) कोणत्याही नागरिकाला शासनाचे अभिलेख, दस्तऐवज, लॉगबुक, हजेरीपत्रक, परिपत्रके, आदेश, अहवाल, यांच्या नकला-प्रती घेता येतात.

6) विशेष बाब म्हणजे- या कायद्याच्या कलम 4(1) प्रमाणे सरकारी यंत्रणेबरोबरच शै. संस्था, सहकारी संस्था, सार्वजनिक बँका, स्वयंसेवी संस्था यांनी त्यांच्याकडील सर्व अभिलेखांची विषयवार विभागणी करून ती सूचीबद्ध पद्धतीने करून ठेवायची आहे. त्याचबरोबर जनतेला परस्पर माहिती घेण्यासाठी वेबसाईट वर सर्व माहिती उपलब्ध करून द्यावयाची आहे.

7) या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, माहिती अधिकाऱ्याने माहिती मागणाऱ्या कोणत्याही नागरिकाला तुम्ही माहिती का मागता अशी विचारणा करायची नाही. कारण लोकशाहीमध्ये माहिती मागण्याचा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्कच आहे.

* माहिती घेण्याची कार्यपद्धती

ज्या नागरिकाला माहिती द्यावयाची आहे त्याने दहा रूपयांचा कोर्ट फी स्टँप अर्जावर लावून रोख रक्कम भरून अर्ज करावा. अर्ज करतांना त्यातील वाक्यरचना व शब्दरचना अचूक असणे आवश्यक आहे. अन्यथा तांत्रिक त्रुटीचा फायदा घेऊन, संबंधित अधिकारी विलंब करतील किंवा नकार देतील. आपण अर्ज दिल्यानंतर ३० दिवसाच्या आत सर्व माहिती संकलित करून माहिती अधिकाऱ्याने आपणास द्यावयाची आहे. ३० दिवसात माहिती न मिळाल्यास किंवा नाकारल्यास तुम्ही पुढील ३० दिवसात अपील अधिकाऱ्याकडे अपील करू शकता. अपील केल्यानंतर जास्तीत जास्त ४५ दिवसात अपील अधिकाऱ्याने निकाल दिला पाहिजे. या वेळेत निकाल न मिळाल्यास तुम्ही ९० दिवसात राज्य जन माहिती आयुक्ताकडे दुसरे अपील करू शकता.

डॉ.बी.टी.लहाने
प्राचार्य, संभाजीराव केंद्रे
महाविद्यालय, जळकोट